# श्री चैतन्यस्वामी स्तवनस्तोत्र



— सद्गुरु प्रभु विरचित

श्री चैतन्यस्वामी

किमत २ रुपये

श्री सद्गुरु अण्णामहाराज तथा

पूज्य चैतन्यस्वामी स्तवन स्तोत्र

## — सद्गुरु प्रभु विरचित —

—: संपादक व प्रकाशक :—

गुं. फ. आजगांवकर, १७ के. जी. बी. निवास

गिरगांव मुंबई ४

श्रीगणेशाय नम। श्रीसीतारामचंद्राय नमः। श्रीगुरुभ्यो नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीगुरुदत्तात्रेय प्रसन्नोस्तु। श्रीस्वामी चैतन्य महाराजाय नमः।

ॐ श्रीगणनायका। सर्वसिद्धी फलदायका।
अज्ञान भ्रांति छेदका। बोधरूपा ॥ १ ॥

ॐ नमो श्री गजानना। सगुणा आणि निर्गुणा।
चिदानंद आनंदघना। नमन करितों साष्टांगी ॥ २ ॥

ॐ ब्रह्मस्वरूप शिवनंदना। विश्वआदिबीज मूल कारणा।
विघ्ननाशाय भवभय हरणा। प्रेमें नमना तुला असो ॥ ३ ॥

नमितों श्री सरस्वती। जगन्माता भगवती।
ब्रह्मकुमारी–विणावती। विश्वमाता माउली ॥ ४ ॥

तूं सर्वांगे सुंदर। सकळ विद्यांचे आगर।
तुजसीं माझा नमस्कार। साष्टांगभावें ॥ ५ ॥

नमन माझें गुरुवर्या । देवादिदेव गुरुराया ।
स्मरतो पवित्र पायां । मनशुद्धी साठीं हो ॥ ६ ॥

जयजयाजी त्रिगुणात्मका । जयजयाजी त्रिगुणातीता ।
जयजयाजी अव्यक्ता । स्वयंप्रकाशी तूं असती ॥ ७ ॥

जयजयाजी निराकारा । तैसाची तूं आकारा ।
जयजयाजी दयासागरा । चराचर तूं असती ॥ ८ ॥

जयजयाजी विश्वात्मका । जयजयाजी विश्वनाथा ।
जयजयाजी हरीनाथा । विश्वपालक तूं असती ॥ ९ ॥

ऋषीमुनी संतजन । तुम्हासी माझे वंदन ।
मज द्यावे वरदान । चैतन्य स्तवन करण्यातें ॥ १० ॥

नमन माझे चैतन्य देवा । स्तवना मज आशिर्वाद द्यावा ।
मी करतो आपुला धावा । स्तोत्रपूर्ण करण्याते ॥ ११ ॥

राजापुरी तिवरे ग्रामी। जन्म घेती अण्णास्वामी।
संतांच्या सहवासांतुनी। समर्थ शिष्य जाहले ॥ १२ ॥

केडगावीं नारायण। दाणोलीचे साटम।
बाळ महाराज थळग्राम। दादामहाज सातारचे ॥ १३ ॥

स्वामी समर्थ उपासिका। साध्वी राधाबाई सेविका।
समर्थ प्रसाद दे भाविका। पूजाअर्चा नित्यकरी ॥ १४ ॥

या संतांच्या सहवासीं। अण्णा धरती भक्तिपंथासी।
दत्तावतारी स्वामी समर्थांसी। गुरू मानिलें तयांनी ॥ १५ ॥

आतां सांगतों गुरुपरंपरा। जेणे परमार्थ येई घरा।
अण्णा मिळविती परमानंद खरा। धन्य अण्णा महाराज ॥ १६ ॥

दत्तात्रेय मुनीश्रेष्ठ। विष्णु अवतार तपोनिष्ठ।
त्रिगुणातीत यती श्रेष्ठ। श्रीपाद होउनि अवतरती ॥ १७ ॥

तद्नंतरी नरसिंह सरस्वती। अक्कलकोटी समर्थ यती।
टेंबस्वामी माणगावीं जन्मती। तेही अवतार श्रीगुरूचे॥ १८॥

वय चौदा होतां अण्णांनी। प्रयाण केले तिवरें येथुनी।
मुंबापुरी येऊनी। समर्थ अनुसंधानीं राहिले॥ १९॥

धन्य धन्य अक्कलकोट। स्वामी समर्थांचें भक्तिपीठ।
अनेक भक्तां दाविती वाट। नवविधा भक्तीची॥ २०॥

काहीं लोकां समर्थ दर्शन। काहीना स्वप्नी मार्गदर्शन।
काहीं जणाना अनुग्रह देऊन। मार्गीं लाविले समर्थांनी॥२१॥

स्वामीसमर्थ देती प्रेरणा। अण्णा करिती उपासना।
समर्थसेवक होती अण्णा। बालपणापासोनी॥ २२॥

अण्णा तुम्ही चैतन्यरूप। तणे चित्कला अमाप।
संविती असे ज्ञानरूप। परमानंद आम्हां तुम्ही॥ २३॥

आनंदनाथांचीं भजनें। अण्णा गाती तन्मयतेनें।
स्वामी समर्थां एकतानतेनें। प्रतिदिन आळविती ॥ २४ ॥

श्रेष्ठ कनिष्ठ नाहीं भेद। सर्वांशीं वागणे अभेद।
देवदेवता माजी एकत्व। अण्णा पाहती समत्वानें ॥ २५ ॥

रागद्वेष नसे मनी। प्रेमबुद्धीनें वागतां स्वामी।
आनंदाश्रू वाहती नयनीं। भजनानंदीं निमग्न ॥ २६ ॥

अण्णा करिती नामस्मरण। तैसेच करिती भजनपूजन।
स्वामी पाठ स्तोत्र पठण। नित्यनियमें होत असे ॥ २७ ॥

अण्णा असती जीवनमुक्त। नित्य आत्मानंदांत।
आसक्तीपासुनी अलिप्त। सहजयोग त्यांचा असे ॥ २८ ॥

चैतन्यस्वामी असती शांत। गोड स्वभाव मनांत।
त्यांचा आचार मोहरहित। आत्मस्वरूप जाणती ॥ २९ ॥

नित्य समर्थ चिंतन। निर्मळ आणि शांत मन।
अण्णा होती धन्य पावन। भक्तां मार्गीं लाविती॥ ३०॥

नामस्मरण महती। अण्णा विशद करिती।
नामस्मरणें लोक तरती। म्हणोनी नामस्मरण करावें॥ ३१॥

मन एकाग्र नामांत। तें करी वृत्तीमुक्त।
अहंता नष्ट होत। मन निरामय होतसे॥ ३२॥

एकाग्रतें ये समग्रता। मना येई व्यापकता।
थारा न मिळे द्वैता। अद्वैत प्रचिती येत असे॥ ३३॥

सर्वांमाजी एकत्व। सर्वत्र दिसे भगवंत।
दुजाभाव मनांत। न स्पर्शे कधीकाळीं॥ ३४॥

नामी असावी रति। नामीं असावी प्रीति।
अन्यस्थळीं विरक्ती। नामसमाधी सार्थ होय॥ ३५॥

जे जे येती मुंबापुरीं । महाराजां भेटा सत्वरीं ।
चित्तचैतन्य भेट खरी । प्रचिती येई तयांना ॥ ३६ ॥

हें स्तोत्र जो करी पठण । त्याची कामना होय पूर्ण ।
त्यावरी कृपादृष्टीपूर्ण । अण्णामहाराज करिती ॥ ३७ ॥

हें स्तोत्र महाराजांचे । मनोभावें करितां पठण याचें ।
संकटमुक्त करिति स्वामी माझे । सद्गुरु प्रभु सांगतसे ॥३८॥

गुरुमहाराजां माझी विनंति । हें स्तोत्र जे नित्य वाचिती ।
त्या सर्वांची इच्छापूर्ती । त्वरें आपण करावी ॥ ३९ ॥

श्रीराम देती प्रेरणा । तेणेचि होई ही रचना ।
सद्गुरु प्रभु निमित्त माना । कार्य महाराजांचे ॥ ४० ॥

[ इति श्री राम प्रेरणया सद्गुरुप्रभु विरचित अण्णा महाराज तथा चैतन्य स्वामी स्तवन स्तोत्र संपूर्ण ॥ ओवी संख्या ४० ]

## आमचीं पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री स्वामी समर्थ स्तवन गाथा | पृ. ६०० | किं. २१० रु. |
| २. | श्री स्वामी पत्रनामृतार्थ, समर्थ परंपरा, स्तोत्रे व संत चरित्रे | पृ २०० | किं. ६० रु. |
| ३. | श्री वासुदेवानंद चरित्र स्तोत्र | | किं. २ रु. |
| ४. | श्री राघवेंद्र स्वामी स्तोत्र | | ,, ३ रु. |
| ५. | सातेरी स्तोत्र | | ,, २ रु. |
| ६. | वेतोबा स्तवन मुक्तावली | | ,, २ रु. |
| ७. | श्री नारायण स्तोत्र | | ,, ५ रु. |
| ८. | श्री स्वामी समर्थ स्तोत्र | | ,, २ रु. |

गुं. फ. आजगांवकर, १७, के. जी. बी. निवास, मुंबई–४०० ००४.

मुद्रक : वि. ज. देसाई, वैभव प्रि. प्रेस, गिरगांव ४